।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

## दहा नोंदणीकृत पदवीधरांची अधिसभेवरील निवडणूक अधिसूचना

## दहा नोंदणीकृत पदवीधरांची नोंदणी/निवडणूक २०२२ करिता मतदार यादी अद्ययावत करण्यासाठीचे

## जाहीर प्रगटन

सर्व सबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या अधिसभेवरील पदवीधर मतदार संघातून दहा नोंदणीकृत पदवीधरांची नव्याने निवडणूक घेण्यासाठी, नवीन मतदार यादी तयार करणेसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८(२)(t) नुसार दहा सदस्यांची अधिसभेवर निवड करावयाची आहे. या दहा सदस्यांपैकी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती, इतर मागासवर्ग यातील प्रत्येकी एक व्यक्ती असेल आणि एक महिला असेल.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३१(३) अन्वये "नोंदणीकृत पदवीधर होऊ इच्छिणारी प्रत्येक व्यक्ती, परिनियामाद्वारे, विद्यापीठाने विहित केलेल्या नमुन्यात कुलसचिवांकडे अर्ज करील आणि निर्धारित शुल्क भरेल."

यानुसार ज्या पदवीधारकांना विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधारकांच्या नोंदवहीत नावे नोंदवावयाची असतील ते पदवीधारक नोंदणी करतील. तसेच मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधारकांना त्यांच्या इच्छेनुसार पदवीधर मतदार यादीत नाव समाविष्ट करावयाचे असल्यास मतदार यादीत नाव समाविष्ट करतील.

**नोंदणीकृत पदवीधर होऊ इच्छिणारी प्रत्येक व्यक्तीकरिता आवश्यक माहिती पुढीलप्रमाणे:**

०१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पदवीधर तसेच १९९७ पुर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे पदवीधर परंतु ज्यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये नोंदणीकृत पदवीधर म्हणुन नोंदणी झाली नाही व प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात निवास करीत आहेत असे पदवीधर, प्रस्तुत विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर म्हणुन नोंदणी करण्यासाठी विद्यापीठाकडे परिनियमाद्वारे विद्यापीठाने विहित केलेल्या नमुन्यात अर्ज करू शकतात.

०२) पदवीधर नाव नोंदणी व मतदार नोंदणीसाठी रू १५/— (अक्षरी रुपये पंधरा मात्र) शुल्क राहील. सदरचे शुल्क ऑनलाईन पेमेंट गेटवे अथवा रोखीने भरण्यासाठी व अर्ज स्वीकारण्याची सुविधा खालील केंद्रावर उपलब्ध करून देण्यात आली आहे:

(रोखीने शुल्क भरावयाचे असल्यास ऑनलाईन अर्ज सादर करण्यापुर्वी शुल्काची पावती घेवून त्या पावतीचा क्रमांक अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक आहे)

| अक्र | जिल्हा | शुल्क व अर्ज कार्यालयीन वेळेत स्वीकारण्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | नांदेड | प्रस्तुत विद्यापीठाच्या कॅश कांऊटरवर शुल्क भरावे. अर्ज शुल्क पावतीसह निवडणूक विभागामध्ये जमा करावा. |
| २ | लातूर | अर्ज व शुल्क प्रस्तुत विद्यापीठ उपपरिसर, पेठ, औसा रोड, लातूर येथे जमा करावे |
| ३ | परभणी | अर्ज व शुल्क प्रस्तुत विद्यापीठ उपपरिसर, परभणी (वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी) येथे जमा करावे |
| ४ | हिंगोली | अर्ज व शुल्क न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली येथे जमा करावे |

०३) पदवीधर नोंदणी अर्ज विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर निवडणूक दालन/Election Portal 2022 वर Online Application for Registration of Graduates या Link वर उपलब्ध आहे.

०४) ऑनलाईन अर्ज करतेवेळेस पदवी प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटो, स्वाक्षरी, निवासाचा पुरावा व रोखीने शुल्क भरले असल्यास शुल्काची पावती अपलोड करणे आवश्यक आहे. यापूर्वीच्या नोंदणीकृत पदवीधारकांना सुध्दा पासपोर्ट साईज फोटो, स्वाक्षरी व निवासाचा पुरावा तसेच रोखीने शुल्क भरले असल्यास शुल्काची पावती अपलोड करणे आवश्यक आहे.

**०५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची मुदत दिनांक ०६ जून, २०२२ ते दिनांक ३० जून, २०२२ पर्यंत राहील. यानंतर मुदतवाढ दिली जाणार नाही.**

०६) प्रस्तुत विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांना त्यांच्या इच्छेनुसार पदवीधर मतदार यादीत नाव समाविष्ट करावयाचे असल्यास त्यांनी विहित केलेले अर्जामध्ये Register Graduate No. या रकान्यात त्यांचा पदवीधर मतदार नोंदवहीतील अनुक्रमांक व वर्ष टाकून (पदवीधर नोंदवही विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. कृपया आपला अनुक्रमांक व वर्ष त्या नोंदवहीतून तपासून घ्यावा) रू १५/— शुल्क भरणा करुन अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

०७) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक १७ मे, २०१७ चे एकरुप परिनियम क्रमांक २ नुसार एकच अर्ज असेल (पूर्वीचा नमुना अर्ज 'अ' आणि 'ब' आता एकत्रित करण्यात आलेला आहे.)

०८) ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून त्यासोबत पदवी प्रमाणपत्र व निवासाचा पुरावा (आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना यापैकी कोणताही एक पुरावा) व रोखीने शुल्क भरले असल्यास शुल्क भरल्याचा पुरावा प्रस्तुत विद्यापीठाचे मुख्य प्रशासकीय इमारतीतील, सभा व निवडणूक विभागात प्रत्यक्ष अथवा पोस्टाने दि. ०४ जुलै २०२२ रोजी सायंकाळी ५.०० पर्यंत जमा करावेत/पोहेचतील अशा रितीने पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

०९) विवाहित महिला पदवीधरांनी लग्नानंतरच्या नवीन नावाने नोंदणी करण्यासाठी विवाह नोंदणी प्रमाणपत्र/शासन राजपत्र किंवा नवीन नाव असलेले आधार कार्ड यापैकी कोणताही एक पुरावा अर्जासोबत जोडावा व ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करावा.

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३१ (२) नुसार खालील व्यक्ती नाव नोंदणीसाठी अपात्र असतील:**

जी व्यक्ती –

क) विकल मनाची असेल व एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केलेले असेल; किंवा

ख) अमुक्त नादार असेल; किंवा

ग) ज्यात नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल अशा एखाद्या अपराधाबद्दल जिला दोषी ठरविण्यात आले असेल;

घ) लबाडीच्या मार्गाने एखादी पदवी मिळविली असेल; किंवा

ङ) राज्यात कायद्याद्वारे स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाची नोंदणीकृत पदवीधर असेल;

ती व्यक्ती पदवीधरांच्या नोंदवहीत आपल्या नावाची नोंद करुन घेण्यास किंवा नोंदणीकृत पदवीधर असण्यास अर्ह असणार नाही.

**टिप :**

प्रस्तुत विद्यापीठाच्या विविध प्राधिकरण गठणाच्या अनुषंगाने निवडणूक–२०२२ संबंधी विविध अधिसूचना, परिपत्रके, सूचना, माहिती ही विद्यापीठाचे संकेतस्थळ htpp://www.srtmun.ac.in या संकेतस्थळावरील Election Portal 2022 या लिंकवर प्रसिध्द करण्यात येतील. यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिकरित्या व स्वतंत्रपणे केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

जा.क्र. स्वारातीमविनां/सनि/पदवीधर जाहीर प्र./२०२२–२३/९३
दिनांक: ०३/०६/२०२२

**कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्वाचन अधिकारी,**
**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

Swami Ramanand Teerth Marathwada University Estd. 17 Sep. 94 Nanded